# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दिनांक : ०३ डिसेंबर, २०२०

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

### अंतिम पूर्व वर्ष सर्व अभ्यासक्रमांच्या अनुशेषित/श्रेणीसुधार परीक्षा-डिसेंबर, २०२०
### विद्यार्थ्यांच्या माहितीकरिता जाहीर प्रकटन

दिनांक ८ डिसेंबर, २०२० ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२० दरम्यान अंतिम पूर्व वर्ष सर्व अभ्यासक्रमांच्या अनुशेषाच्या/श्रेणीसुधारच्या परीक्षा संपन्न होणार आहेत. या परीक्षांकरिता विविध सामाजिक माध्यमातून विद्यार्थ्यांना काही शंका/प्रश्न निर्माण झाल्याचे आढळून आले आहे. त्याबाबतची स्पष्टता पुढीलप्रमाणे -

१. परीक्षा अर्ज परत भरता येतील का ?

दिनांक ५ डिसेंबर, २०२० पासून टप्प्याटप्प्याने सर्व अभ्यासक्रमांच्या सर्व विषयांच्या नियमित व अनुशेषांतर्गत परीक्षांचे अर्ज विद्यार्थ्यांना भरण्याकरिता उपलब्ध होतील. याबाबतची सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. दिनांक ८ डिसेंबर, २०२० पासून सुरु होणा-या परीक्षांकरिता सद्यस्थितीत परीक्षा अर्ज/विकल्प अर्ज भरता येणार नाहीत.

२. परीक्षांकरिता नोंदणीकृत ई-मेल आयडी बदलायचा असेल तर -

विद्यापीठाने उपलब्ध करुन दिलेल्या SPS (Students Portal System) मध्ये ई-मेल आयडी नोंदणीकृत केलेला आहे. शक्य तो सदर नोंदणीकृत ई-मेल आयडीव्दारे विद्यर्थ्यांनी परीक्षा देणे उचित ठरेल. काही तांत्रिक कारणास्तव ई-मेल आयडी बदलायचा असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह व अर्जासह श्री.ललित पवार व श्रीमती स्वाती बारहाते, विशेष कार्याधिकारी, परीक्षा विभाग यांचेशी संपर्क साधावा.

३. एक्झाम प्रॉक्टेड असेल की नाही --

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदीनुसार परीक्षांबाबतची संवेदनशीलता, गोपनीयता व सुरक्षितता जपण्याच्या दृष्टीने अनुशेषित/श्रेणीसुधार परीक्षा या अंशतः प्रॉक्टेड पध्दतीने होतील. याकरिता AI Based Image Proctoring & Analysis of Data पध्दतीचा अवलंब करण्यात येईल. या परीक्षांकरिता वापरण्यात येणारे गॅझेट्स/उपकरणांमध्ये फ्रंट कॅमेरा असणे आवश्यक आहे.

४. पास होण्यासाठी किती मार्क्स लागतील ?

दिनांक ८ डिसेंबर, २०२० पासून सुरु होणा-या परीक्षा या ५० गुणांच्या असून अभ्यासक्रमनिहाय सत्र समाप्तीच्या परीक्षांच्या आराखडयानुसार त्यांचे रुपांतर केले जाईल. त्यानुसार गुण दिले जातील. सदर अभ्यासक्रमांसाठी उत्तीर्ण होण्याकरिता निश्चित केलेल्या गुणांनुसारच निकाल जाहीर होतील.

५. रेग्युलर सेमिस्टरच्या एक्झामचे काय ?

नियमित परीक्षांकरिता परीक्षा अर्ज दिनांक ५ डिसेंबर, २०२० पासून सुरु असून जानेवारी, २०२१ च्या मध्यानंतर सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षातील परीक्षा आयोजित केल्या जातील.

६. एमसीक्यु ची तयारी नेमकी कशी करायची ?

## MCQ परीक्षा सत्य व वास्तव...

विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानार्जनासोबत परीक्षा अतिशय महत्त्वाची आहे. तीन किंवा चार वर्षे खडतर अभ्यास करून मिळवलेल्या ज्ञानाचा परीक्षेमुळे एक चांगला शेवट होतो.

यंदा सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर देशभरात परीक्षा होणार आहेत. आरोग्य विषयक विविध सुरक्षा उपायांचा व मार्गदर्शक तत्वांचा वापर करून होणाऱ्या या परीक्षा यंदा थोड्या वेगळ्या प्रकारे म्हणजेच ट्रॅडिशनल पारंपारिक स्वरूपात न होता बहुपर्यायी प्रश्न म्हणजेच mcq प्रकारामध्ये होणार आहेत.

या परीक्षा देत असताना विद्यार्थ्यांना या परीक्षा प्रकाराचा अभ्यास जुन्या निबंध स्वरूपातील परीक्षेप्रमाणे करायचा नसून इथे योग्य पर्यायाचे उत्तर सिलेक्ट करायचे आहे, त्यामुळे. अभ्यास स्मार्टली करायचा आहे. यात विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा थेट कस लागणार आहे. यामध्ये कोणतीही शाब्दिक निबंधबाजी किंवा जादाचे पानभरू उत्तर लिखाण नाही. जे आहे ते थेट. मुद्द्याला धरून. डायरेक्ट.

MCQ स्वरूपातील प्रश्नांचा अभ्यास करत असताना आपल्याला कोणत्या प्रकारचे प्रश्न विचारले जाऊ शकतात आणि त्या प्रश्नांचा हेतू काय असू शकतो हे लक्षात घेतलं पाहिजे.

MCQ स्वरूपातील परीक्षेच्या प्रश्नांचे स्वरूप विद्यार्थ्यांचे पुढीलप्रकारचे ज्ञान व क्षमता तपासण्या करता केला जाऊ शकतो.

१. रिकॉल म्हणजेच स्मरणशक्तीवर आधारित प्रश्न

- या प्रश्नांमध्ये आपण शिकलेल्या व समजून घेतलेल्या माहितीच्या आधारे स्मरणशक्तीवर आधारित प्रश्न विचारले जातात. ज्यामध्ये व्याख्या, महत्वाच्या कन्सेप्ट, फॅक्ट्स व फिगर्स, महत्वाची सूत्रे याबाबतीतील स्मरणशक्तीवर सोडवता येतील असे प्रश्न असतात.

२. कॉम्प्रिहेन्शन - आकलन अथवा समजलेल्या ज्ञानावर आधारित प्रश्न-

अशा प्रकारच्या प्रश्नांमध्ये विद्यार्थ्याने त्याच्या अभ्यास क्षेत्रात किंवा त्या विषयात शिकलेल्या ज्ञानाचे आकलन अथवा समज किती आहे म्हणजेच विद्यार्थ्याचे बेसिक अंडरस्टँडिंग किती आहे हे पाहण्याकरता प्रश्न विचारले जातात. असे प्रश्न फक्त स्मरणशक्तीवर आधारित नसून त्याच्या पुढील विद्यार्थ्याच्या आकलनक्षमतेवर आधारित असतात. म्हणजेच नुसतेच आठवण्यापेक्षा त्याला किती, काय व कसे कळाले आहे हे तपासण्याचा हेतू या प्रश्नांमध्ये असतो.

३. एप्लीकेशन अथवा उपयोजन आधारित प्रश्न-

या प्रश्नांमध्ये विद्यार्थ्याच्या त्या विषयाच्या संदर्भातील प्रश्न सोडवताना लॉजिकल स्किल्स म्हणजेच तार्किक क्षमता, कारणमीमांसा करण्याची क्षमता म्हणजेच रीझनिंग स्किल्स कसे आहेत हे तपासण्या करता प्रश्न विचारले जातात. मागील प्रश्नांपेक्षा हे प्रश्न थोडे पुढील पातळीवरचे असतात. ज्यामध्ये फक्त तुम्हाला शिकलेल्या कन्सेप्ट चे उपयोजन म्हणजेच एप्लीकेशन करता आले पाहिजे. उदाहरणार्थ, नुसती सूत्रे माहित असून उपयोग नाही तर दिलेल्या प्रश्नातील माहितीनुसार त्या सूत्रांचा योग्य वापर करून तो प्रश्न त्या प्रकारच्या कंडिशन्स प्रमाणे सोडवता आला पाहिजे.

४. अॅनालिसीस व सिंथेसिस म्हणजेच विश्लेषण व पृथक्करणात्मक प्रश्न-

या प्रकारच्या या प्रश्नांमध्ये विद्यार्थ्याला काही माहिती दिली जाते व त्यावर आधारित प्रश्न विद्यार्थ्याला विचारले जातात. आता ही माहिती केस स्टडी च्या माध्यमात असेल किंवा बार चार्ट पाय चार्ट किंवा काही कॉमन डाटा स्वरूपात दिली असू शकते. या माहितीचा वापर करून त्यावर आधारित प्रश्न व त्याचे पर्याय दिलेले असतात. दिलेल्या माहितीचा वापर करून या प्रश्नातील माहितीचे विश्लेषण व पृथक्करण विद्यार्थी करतो. तसेच वरील तीन क्षमतांचा वापर करणे गरजेचे असते. जेणेकरून प्रश्नाचे उत्तर सोडवता येते.

⍰ MCQ प्रकारातील प्रश्नांचा अभ्यास करताना काही टिप्स-

१. सर्व व्याख्या, संज्ञा, महत्वाच्या कन्सेप्ट, महत्वाची सूत्रे यांचा नीट अभ्यास करावा.

२. अभ्यास करत असताना महत्त्वाच्या मुद्द्यांवर MCQ च्या स्वरूपात काय प्रश्न येऊ शकतात व त्याच्या बरोबर पर्यायांसह कोणती चुकीचे पर्याय दिले जाऊ शकते, याचा विचार करा. या पद्धतीचा वापर म्हणजे योग्य उत्तरे नीट लक्षात राहतात व आठवतात.

३. रीडिंग बिटवीन द लाईन्स म्हणजेच वाचताना भारंभार सर्वकाही वाचण्याची गरज नाही तर मुद्द्याचे, महत्त्वाचे व ज्यावर बहुपर्यायी प्रश्न विचारता येऊ शकतात, त्यावर जास्त लक्ष केंद्रित करा.

४. अभ्यास करत असताना स्वतः प्रश्न काढण्याचा सराव करा. हे करत असताना वरील चार हेतू म्हणजेच प्रश्नांचे प्रकार लक्षात ठेवा. जेणेकरून अभ्यास करणे सोपे जाईल.

५. इंटरनेटवर तुमच्या विषयातील अभ्यासक्रमावर आधारित MCQ प्रश्न सहसा उपलब्ध असतात. त्यातील तुमच्या अभ्यासक्रमाला लागू होणारे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करा. याचा नक्कीच फायदा होतो.

⍰ MCQ प्रकारातील प्रश्न सोडवताना काही टिप्स -

१. प्रश्नपत्रिका मिळाल्यानंतर कोणत्याही प्रकारे घाबरून जाण्याची गरज नाही. विचारांची शांतता व मनाची एकाग्रता फार गरजेचे आहे. याकरता प्रश्नपत्रिकेत वरील सर्व सूचना नीट वाचा. समजून घ्या.

२. पर्याय सिलेक्ट करण्याअगोदर प्रश्न नीट वाचा. त्याखालील सगळे पर्याय नीट वाचा. आपल्या गृहीतकाच्या आधारे न जाता त्या प्रश्नात नेमके काय दिले आहे व काय विचारले आहे, हे नीट समजून घेऊन मगच उत्तर देणे श्रेयस्कर ठरते.

३. मेथड ऑफ एलिमिनेशन म्हणजेच चुकीचे पर्याय बाजूला काढणे व बरोबर उत्तराकडे जाणे महत्त्वाचे ठरते. यामुळे वेळ वाचतो व बरोबर पर्याय सिलेक्ट करण्यास मदत होते.

४. कोणत्याही प्रश्नाचे उत्तर घाईगडबडीने देऊ नका. मनात आलेले उत्तर योग्य आहे का हे एकदा नीट चेक करा आणि मगच तो पर्याय सिलेक्ट करा.

५. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे प्रश्नपत्रिका किती मार्कांची आहे, किती प्रश्नांची आहेव प्रत्येक प्रश्नाला किती मार्क आहेत हे नीट पहा.

६. MCQ परीक्षाप्रकार असल्यामुळे वेळेकडे काटेकोरपणे लक्ष द्या. तुलनेने सोपे असलेले प्रश्न आधी सोडवण्यास काहीच हरकत नाही.

मित्रहो, या परीक्षेचा अभ्यास करत असताना मनाची एकाग्रता आणि शांतता अतिशय महत्त्वाची आहे. यामुळेच तुमचा अभ्यास चांगला होणार आहे. याकरता पुढील काही दिवस तब्येतीकडे नीट लक्ष द्या. खाण्यापिण्यावर नीट लक्ष द्या. अभ्यासाचे एक रुटीन वेळापत्रक तयार करून जास्तीत जास्त अभ्यास करायचा प्रयत्न करा.
मानसिक संतुलन टिकवण्याकरता येते काही दिवस मानसिक शांतता घालवणाऱ्या जसे की करोना संदर्भातील बातम्या, वायफळ गप्पा टप्पा आदी गोष्टी पहाणे टाळा.

स्वतःच्या क्षमतांवर व अभ्यासावर विश्वास ठेवा.

महेश काकडे
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ